आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र -संध्याकाळी ७.००वाजता

१३ जानेवारी २०२५ - सोमवार

**ठळक बातम्या**

- सर्वांना विश्वासात घेऊन शक्तीपीठ महामार्गाच्या कामाचं नियोजन तत्परतेने सुरू करण्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

- सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरुपी यंत्रणा उभारण्याची मुख्यमंत्र्यांची सूचना

- हज यात्रेला देशातल्या पावणे २ लाख नागरिकांना जाण्याची संधी मिळणार

**आणि**

- सेन्सेक्समध्ये १ हजार तर निफ्टीमध्ये साडे तिनशे अंकांची घसरण

**<><><><><>**

राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी शक्तीपीठ महामार्गाच्या कामाचं नियोजन सर्वांना विश्वासात घेऊन तत्परतेनं सुरु करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी दिले आहेत. आगामी शंभर दिवसात सार्वजनिक बांधकाम विभागानं करायच्या कामाचा आढावा मुख्यमंत्र्यांनी आज घेतला.

समृद्धी महामार्गाचं उर्वरित अंतिम टप्प्याचं आमणेपर्यंतचे ७६ किलोमीटर लांबीचे काम तत्परतेनं पूर्ण करुन फेब्रुवारीपर्यंत हा महामार्ग पूर्णपणे खुला करावा, तसंच मंत्रालय परिसरात नविन सात मजली इमारत उभारण्याच्या कामाची सुरवात येत्या शंभर दिवसात करावी, अशा सूचनाही मुख्यमंत्र्यांनी दिल्या.

येत्या १०० दिवसात इतर मागास बहुजन कल्याण विभागानं करायच्या कामांचा आढावाही मुख्यमंत्र्यांनी घेतला. विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या महामंडळांच्या लाभार्थ्यांकरता वेबसाइटची निर्मिती तात्काळ करावी,

महामंडळाच्या वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजनेची कर्ज मर्यादा वाढवण्याबाबतही प्रस्ताव सादर करावा, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

**<><><><><>**

सोयाबीन खरेदीसाठी कायमस्वरुपी यंत्रणा उभारण्याची सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केली आहे. पणन विभागाच्या १०० दिवसांच्या कामाचा आढावा घेताना ते बोलत होते. समृध्दी महामार्गालगत ॲग्रो हब उभारा, कांदा साठवणुकीसाठी कांदा चाळींची संख्या वाढवा असेही आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले. अधिक जाणून घेऊया आमच्या प्रतिनिधीकडून

**होल्ड व्हाइस कास्ट**

*नवी मुंबईत शेतमालासाठी महा बाजार उभारण्याचं नियोजन आहे. हा बाजार आंतरराष्ट्रीय दर्जाचा असून किमान दोनशे ते अडीचशे एकर जागेत हा प्रकल्प राबवला जाणार असल्याचं अपर मुख्य सचिव राजगोपाल देवरा यांनी सांगितले. राज्यातल्या प्रत्येक तालुक्यात एक बाजार समिती, कोकणात माशांसाठी तर आदिवासी भागात स्थानिक उत्पादनासाठी बाजार समिती स्थापन केली जाणार असल्याचं पणन मंत्री जयकुमार रावल म्हणाले.*

*संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना संविधानिक मूल्यं शिकविण्यावर भर द्यावा, असे निर्देश मुख्यमंत्र्यांनी शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत दिले. राज्यातल्या शालेय शिक्षकांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. त्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देऊन चांगलं परिवर्तन घडू शकतं. या बळावर महाराष्ट्र शालेय शिक्षणामध्ये पुन्हा एकदा आघाडीवर येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.*

*पर्यटन विभागानं करायच्या कामाचा आढावा घेताना, राज्यात केंद्र आणि राज्य शासनाकडून राबवले जाणारे पर्यटन प्रकल्प गतीनं पूर्ण करण्यावर भर देण्याचे*

*निर्देश फडणवीस यांनी दिले. पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी राज्यात पर्यटन पोलीस नेमणार असल्याचं फडनवीस यांनी सांगितलं, पर्यटन विभागाच्या १४ सेवा 'आपले सरकार' संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचे निर्देश त्यांनी दिले. प्रत्येक जिल्ह्यात मत्स्यालय, धार्मिक स्थळं, विमानतळ विकसित करा. पहिल्या टप्प्यात शिर्डी, पुणे, नागपूर, शेगाव इथं काम सुरू करा, अशा सूचना त्यांनी दिल्या.*

**<><><><><>**

यंदाच्या हाज यात्रेकरता भारतातून पावणेदोनलाख जणांना जाता येईल. केंद्रीय अल्पसंख्याक कल्याण मंत्री किरेन रिजिजू यांनी समाजमाध्यमावर ही माहिती दिली. हाज यात्रेसाठी भारतीयांचा कोटा एक लाख ७५ हजार २५ असा निश्चित करणाऱ्या करारावर रिजिजू आणि सौदी अरेबियाचे हाज आणि उमरा विभागाचे मंत्री एच ई तौफीक़ बिन फौझान अल- राबिया यांच्या उपस्थितीत आज स्वाक्षऱ्या झाल्या.

**<><><><><>**

देशाच्या ग्रामीण भागाची आर्थिक स्थिती मजबूत करण्यासाठी पशुधन विकास महत्वपूर्ण घटक आहे. पशुधन वाढीच्या माध्यमातून उत्पादन वाढवलं तर ग्रामीण अर्थव्यवस्था निश्चितच सुधारेल, असा विश्वास केंद्रीय मत्स्यपालन, पशुसंवर्धन आणि दुग्धव्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंह यांनी आज पुण्यात व्यक्त केला. पिंपरी चिंचवडमध्ये झालेल्या उद्योजकता विकास परिषद २०२५ या कार्यक्रमाचं उद्घाटन करताना ते बोलत होते. यावेळी त्यांनी २० प्रकल्पांचा प्रारंभ केला.

**<><><><><>**

निवडणूक प्रक्रियेवरील नागरिकांचा विश्वास वृद्धिंगत व्हावा यासाठी ही प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने राबवा, असे निर्देश राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले. ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅटच्या बर्न्ट मेमरी, मायक्रो कंट्रोलरच्या तपासणी आणि पडताळणी प्रक्रियेच्या अनुषंगान पुण्यात यशदा इथं आयोजित कार्यशाळेत ते बोलत होते.

<><><><><>

गेल्या आठवड्यापासून देशातल्या शेअर बाजारात सुरू असलेली घसरण आजही कायम होती. जागतिक आणि स्थानिक कारणांमुळं देशातले दोन्ही शेअर बाजार घसरले. दिवसअखेर सेन्सेक्स १ हजार ४९ अंकांनी कोसळून ७६ हजार ३३० अंकांवर बंद झाला. निफ्टी ३४६ अंकांनी घसरला आणि २३ हजार ८६ अंकांवर स्थिरावला. व्यवहाराच्या दरम्यान निफ्टी २३ हजारांची पातळीही मोडणार अशी शक्यता निर्माण झाली होती.

अमेरिकेत बेरोजगारीचे प्रमाण कमी झाल्यानं व्याजदर कपातीची शक्यता कमी झाली. कच्चा तेलाचे वाढलेले दर, डॉलरच्या तुलनेत घसरत असलेला रुपया, परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांकडून होणारी विक्री यामुळे शेअर बाजारांना फटका बसला. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँका, धातू, वाहन, औषध निर्मिती, बांधकाम यासारख्या जवळपास सगळ्याच क्षेत्रातले समभाग आज घसरले.

<><><><><>

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगमधल्या ग्रामस्थांनी आज पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केलं. सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी वाल्मिक कराड याच्यावर मकोका अंतर्गत कारवाई करावी ही त्यांची मागणी होती. आंदोलनात

देशमुख यांचा भाऊ धनंजय यांच्यासह कुटुंबीय सहभागी झाले होते. बीड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी आंदोलनस्थळी येऊन आंदोलकांशी संवाद साधला. मराठा आरक्षण आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या विनंतीनंतर हे आंदोलन माघारी घेण्यात आलं.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात निहालपाडा इथं एका शेतात चालवल्या गेलेल्या नकली नोटांच्या कारखान्यावर पोलिसांनी काल छापा टाकून ४ जणांना अटक केली. मुंबईत भायखळ्यात पोलिसांनी बनावट नोटांसह तिघांना अटक केली. त्यांनी दिलेल्या माहितीनंतर पोलिसांनी पालघरमधल्या कारखान्यावर छापा टाकून चौथ्या आरोपीला अटक केली. आणखी एका संशयिताचा पोलीस शोध घेत आहेत.

**<><><><><>**

रोजगार हमी योजनेचा लाभ घेऊन पालघर जिल्ह्यातल्या विक्रमगड तालुक्यातल्या खोमारपाडा या गावानं ७० टक्के जणांचं स्थलांतर थांबवलं आहे. गावातल्या प्राथमिक शाळेतले शिक्षक बाबू मोरे यांनी विद्यार्थ्यांना शेतीचे धडे देऊन शाळेतच परसबाग तयार केली. त्यात फुलं, फळं, भाज्या लावल्या. हळूहळू पालकांमध्येही उत्सुकता निर्माण झाल्यानंतर मोरे यांनी त्यांना विविध प्रकारची शेती करण्यासाठी प्रेरित केलं. एकेकाळी इथली ९० टक्के कुटुंबं रोजगारासाठी स्थलांतर करत होती. आता हे प्रमाण ७० टक्क्यांनी कमी झालं आहे. याबद्दल पालघरचे जिल्हाधिकारी गोविंद बोडके म्हणाले-

**बाईट- गोविंद बोडके.**

राज्याच्या इतर जिल्ह्यातही या गावाचं प्रारूप राबवायचं राज्य सरकारनं ठरवलं आहे.

**<><><><><>**

आरोग्यविषयक कार्यक्रमाच्या अंमलबजावणी निर्देशांकात गडचिरोली जिल्हा राज्यात तिसऱ्या क्रमांकावर असल्याची माहिती आरोग्य सेवा संचालनालयानं दिली आहे. गडचिरोली जिल्ह्यानं गरोदर माता नोंदणी, माता - बाल संगोपन, मुलांचं लसीकरण, हिवताप आणि क्षयरोग निर्मूलन अशा वेवेगवेगळ्या ६४ आरोग्य निर्देशांकांत केलेल्या कामगिरीवरून आरोग्य सेवा आयुक्त कार्यालयानं हे गुणांकन केलं आहे.

**<><><><><>**

सोलापुरच्या सिद्धेश्वर यात्रेतला अक्षता सोहळा आज पार पडला. तत्पूर्वी सकाळी सातही नंदीध्वजांचं पूजन करुन बँड, हलगी, ढोल-ताशांच्या गजरात मिरवणुकीला सुरुवात झाली. पालखीतल्या सिद्धेश्वरांच्या दर्शनासाठी रस्त्याच्या दुतर्फा भाविकांची गर्दी होती. मिरवणूक मार्गावर संस्कार भारतीच्या दीडशे स्वयंसेवकांनी साडेतीन किलोमीटर रांगोळी काढून या माध्यमातून विविध सामाजिक संदेश देण्याचा प्रयत्न केला.

**<><><><><>**

महाकुंभ मेळ्याला आजपासून उत्तर प्रदेशात प्रयागराज इथं पौष पौर्णिमेच्या पहिल्या अमृत स्नानाने सुरुवात झाली. उद्या सकाळी होणाऱ्या अमृत स्नान सोहळ्याचं थेट प्रसारण आकाशवाणीच्या मुंबई केंद्रावरून सहक्षेपित केलं जाणार आहे, त्यामुळे आकाशवाणीच्या पुणे आणि छत्रपती संभाजीनगर केंद्रावरून सकाळी

७ वाजून १० मिनिटांनी प्रसारित होणारं प्रादेशिक बातमीपत्र उद्या सकाळी पावणे सात वाजता प्रसारित केलं जाईल.

**<><><><><>**

येत्या दोन दिवसात, राज्यात सर्वत्र हवामान कोरडं राहील, असं पुणे वेधशाळेनं व्यक्त केलं आहे.

**//<><><><><>//**